# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/४०९/२०२१-२२ दि. २०/०५/२०२१

कोविड-19 च्या कामकाजाकरीता सहाय्यक जनसंपर्क अधिकारी या पदासाठी ०३ महिन्याकरीता ठोक मानधन तत्वावर नियुक्त करणेबाबत.

## // जाहिरात //

मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील जनसंपर्क विभागासाठी कोविड-१९ च्या कामकाजाकरीता ०३ महिन्यासाठी ठोक मानधनावर सहाय्यक जनसंपर्क अधिकारी या पदासाठी इच्छुक असलेल्या तसेच अर्हता पुर्ण करणा-या उमेदवारांची थेट मुलाखतीद्वारे (Walk In Interview) निवड करण्यात येणार आहे. सदर उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या मुळ प्रतीसह दि.२८/०५/२०२१ या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत मिरा भाईदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व.इंदिरा गांधी भवन, दुसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे. याबाबतची सविस्तर माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या https://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

१. उपलब्ध पद संख्या व शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|
| १. | सहाय्यक जनसंपर्क अधिकारी (ठोक मानधन रु.25,000/-) | ०१ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी<br>ब) शासनमान्य पत्रकारिता व जनसंज्ञापन (Journalism & Mass Communication) मधील पदविका.<br>क) मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांचे ज्ञान आवश्यक. |

२. वयोमर्यादा :-

उमेदवारासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण व कमाल ३८ वर्षे असुन, मागासवर्गीय उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.

३. अटीशर्ती :-

३.१ सहाय्यक जनसंपर्क अधिकारी (ठोक मानधन) ०३ महिन्याकरीता किंवा कोविड-१९ च्या कालावधीकरीता नेमणूक असेल. तद्नंतर नियुक्ती संपुष्टात येईल.

३.२ उमेदवार हा शारीरिक दृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा झालेला नसावा.

३.३ नियुक्तीच्या कालावधीत नियुक्ती ठिकाणी सोपविलेले काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

३.४ प्रत्येक उमेदवारास १०० गुण देण्यात येईल. संबंधीत पदासाठी नमुद शैक्षणिक अर्हतेचे अंतिम वर्षाचे गुण विचारात घेऊन पदनिहाय गुणांकन खालीलप्रमाणे अनुक्रमे करण्यात येईल.

